# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०४/२०२५ (शुक्रवार)**

---

## एम.पी.डी.ए. मधील पाहीजे आरोपी स्थानिक गुन्हे शाखा , नागपुर ग्रामीण यांच्या ताब्यात

पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत राहणारा सराईत आरोपी नामे **सोहेल अब्दुल खान, वय २३ वर्षे, रा कन्हान खदान क्रं ३ ,ता. पारशिवणी** हा परीसरात गुंडगिरी करून गंभीर दुखापत, अवैध शस्त्रे बाळगणे, चोरी या सारखे अनेक शरीरा विरूध्द तसेच मालमत्ते विरूध्दचे गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित असतो. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. आरोपी नामे सोहेल अब्दुल खान याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी नामे सोहेल अब्दुल खान याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली खापरखेडा पोलीसांकडुन एम.पी.डी.ए. कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली होती. दिनांक १४/११/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार सोहेल अब्दुल खान,याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला होता. परंतु नमुद सराईत आरोपी तेव्हा पासुन मिळुन येत नव्हता.

**मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि मा. श्री रमेश धुमाळ , अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांनी गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुरावे यांच्या मदतीने नमुद आरोपीचा शोध घेवुन त्याला आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी ताब्यात घेतले. पुढील कारवाई साठी आरोपीस खापरखेडा पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**



**आरोपी सोहेल अब्दुल खान**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २४/०३/२०२५ रोजी  उमरेड पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणे कामी  पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी डी मर्सी हॉटेल चौक, उमरेड येथे नाकाबंदी केली असता संशयीत वाहन टाटा कंपनीचा १२ चक्का टिप्पर क्र. एम.एच.४० सि.एम. ३३६१ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली.  वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, उमेश मनोहरजी माथरकर वय ३५ वर्ष रा. हिवरा ता. उमरेड अशी माहीती प्राप्त झाली त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले.पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ९  ब्रास रेती आणि २) १२

चक्का टिप्पर क्र. एम. एच. ४० सि. एम. ३३६१ असा एकुण **४५,३१,५००/—रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी नमुद आरोपी याच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या मोहाफुल दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक २४/०४/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **रामटेक येथील, इंदिरा नगर, कवडक दुधाळा परिसरात अवैधरीत्या मोहफुल दारू विक्री केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी गेले असता आरोपी नामे संदीप रामु बाटबर्वे ,**वय ४० वर्ष रा.इंदिरा नगर कवडक, ता. रामटेक जि. नागपूर हा अवैधरीत्या मोहफुल दारू विक्री करीतांना मिळुन आला. नमुद आरोपी च्या ताब्यातुन ११० लिटर मोहफुल दारू किंमती ५,५०० /—** रुपयांचा मुददेमाल मिळुन आल्याने मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन मुददेमाल नष्ट करण्यात आला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये **गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने